अ) योग्यता प्रमाणपत्राकरिता नविन विहीत नमुन्यातील अर्ज ( विहीत नमुन्याची सत्यप्रत स्वीकारली जाणार नाही.) (Application Form of Eligibility Certificate)

ब) उत्तीर्ण गुणपत्रिका **( इ. 12 वी करीता इ. 10 वी व 11 वी ची गुणपत्रिका ( Marklist ) इंग्रजी विषयास पांच विषयात उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.)** इंग्रजी विषयात अनुत्तीर्ण असणा-या व इंग्रजी विषय नसलेल्या विद्यार्थ्यास प्रवेश दिल्यास मंडळातर्फे योग्यता प्रमाणपत्र दिले जाणार नाही व विद्यार्थ्याच्या शैक्षणिक नुकसानीची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाची राहील.

क) उत्तीर्णता प्रमाणपत्र (इ.11/12 वी करीता इ. 10 वी चे प्रमाणपत्र. (Passing Certificate/Provisional Passing Certificate )

ड) शाळा सोडल्याचा दाखला. ( दाखल्यावर संबंधित इयत्ता 10 वी व इयत्ता 11 वी विद्यार्थ्यांना उत्तीर्ण केलेल्या ठिकाणी असलेल्या शिक्षणाधिकारी /शिक्षण निरिक्षक यांची प्रतिस्वाक्षरी ) (School Leaving/Transfer Certificate with Counter Signature By appropriate Education Officer/Authority)

इ) मूळ स्थलांतर प्रमाणपत्र ( Migration Certificate in Original)

ई) परिशिष्ट 'अ' ( विदेशी विद्यार्थ्यांकरिता योग्यता प्रमाणपत्र अर्ज पृष्ठ क. 4 भरावे. (Appendix 'A' for Foreign students ) वर भारतीय दूतावासाची सही व शिक्का किंवा भारतीय दूतावासाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

उ) कनिष्ठ महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थ्यांकडून मंडळाच्या योग्यता प्रमाणपत्र अर्जासोबत देण्यात आलेल्या विहीत नमुन्यातील हमीपत्रा ( Deed of Undertaking ) वर रू.20/- चा कोर्ट फी स्टॅम्प लावावा. ( मूळ स्थलांतर प्रमाणपत्र, हमीपत्र व परिशिष्ट 'अ' शिवाय कोणतीही महत्वाची कागदपत्रे अर्जासोबत जोडण्यात येवू नये. उर्वरित कागदपत्रांच्या स्वप्रमाणित केलेल्या छायाप्रती ) (Self Attested Copy) अर्जासोबत देण्यात याव्यात.

ऊ) NIOS राष्ट्रीय मुक्त विद्यालय तसेच इतर मुक्त विद्यालय/विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांकरीता वरील कागदपत्रांव्यतिरिक्त ( Enrollment Certificate ) नोंदणी प्रमाणपत्र /Identity Card ची झेरॉक्स प्रत व पूर्वीच्या शाळेची टी. सी. असणे आवश्यक आहे.

4) कनिष्ठ महाविद्यालयांनी योग्यता प्रमाणपत्राचे अर्ज नियमित शुल्कासह दिनांक 16 ऑगस्ट व 15 सप्टेंबर 2018 या दोन टप्प्यामध्ये मंडळाकडे हस्तपोच पाठविण्यात यावेत. **टपालाद्वारे ( By Post ) पाठविलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.** तसेच अपूर्ण माहिती असलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. **अर्जामध्ये विद्यार्थ्याने शाखा ( Stream ) स्पष्ट नमूद करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले सर्व योग्यता प्रमाणपत्र अर्ज संपूर्ण प्रमाणपत्रांच्या प्रतीसह टॅग मध्ये एकत्र बांधून प्रत्येक अर्जावर मुद्रित करण्यात आलेल्या जागे समोर 01 पासून अनुक्रमांक लिहून दयावेत. प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची यादी सोबत जोडलेल्या नमुना फॉर्म मध्ये भरून पाठवावी.**